# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**

(Govt. of Maharashtra Undertaking)

**जा. क्र. मप्राशिप/सशिअ/अध्ययन समृद्धी/२०१७-१८/** १३७८ **दिनांक :** 16 JUN 2017

**विषय : सन २०१७-१८ मध्ये अध्ययन समृद्धी कार्यक्रमाची अंमलबजावणी करणेबाबत....**

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत एप्रिल-२०१७ पर्यंत १०० टक्के मुले प्रगत होण्याचे उद्दिष्ट निर्धारित केले आहे. तथापि, माहे एप्रिल-२०१७ अखेरपर्यंत फक्त ४१,००० शाळा प्रगत झाल्याचे दिसून येते. यावरून निर्धारित उद्दिष्ट साध्य करण्यात अद्याप पूर्णत: यश प्राप्त झालेले नाही. मुलांना वाचन आल्याशिवाय लेखन जमणार नाही हे विविध शैक्षणिक सर्वेक्षणावरून दिसून येते. तसेच गणितामधील मुलभूत संकल्पना दृढीकरणासाठी पायाभूत कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे. या विषयातील संकल्पना दृढीकरणासाठी व मुलांना त्यातून आनंद मिळण्यासाठी भरपूर शैक्षणिक साहित्य वर्गामध्ये उपलब्ध असावयास हवे.

सन २०१७-१८ मध्ये प्रत्येक मुलाला वाचन, लेखन व गणितातील मुलभूत क्रिया अवगत व्हाव्यात यासाठी महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांनी भाषा व गणित या विषयातील विविध संकल्पनांवर आधारित साहित्य विकसित केले आहे. तसेच सदर साहित्य अध्ययन-अध्यापनात प्रभावीपणे वापरण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षणही देण्यात येणार आहे.

सदर साहित्य शाळांना उपलब्ध करून देण्यासाठी अध्ययन समृद्धी कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ साठी दिनांक ०९/०२/२०१७ रोजीच्या भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या इतिवृत्तानुसार मंजूर असणारी तरतूद राज्य स्तरावर राखीव ठेवण्यात येत आहे. तरी आपल्या जिल्हा / महानगरपालिकेसाठी या उप लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूद आपल्या स्तरावरून खर्च करण्यात येऊ नये. या उप लेखाशिर्षाखाली खर्च झाल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी. जिल्हा परिषद व महानगरपालिकांसाठी मंजूर भौतिक लक्ष्य व आर्थिक तरतूद वित्तीय अंदाजपत्रकामध्ये नमूद केली आहे. राज्यस्तरावर राखून ठेवण्यात आलेल्या निधीच्या विनियोगानंतर जे.व्ही. द्वारे खर्च सर्व जिल्हा परिषद व महानगरपालिकांना या कार्यालयाद्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.



सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया
Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

मुलांच्या शिकण्याशी संबंधित, प्रगत शाळा संकल्पना, जी मुले अभ्यासात मागे आहेत पण काही ठोस उपाययोजनांच्या माध्यमातून ती शैक्षणिक प्रभुत्त्व पातळी गाठू शकले आहेत, इत्यादी सारख्या बाबींशी संबंधित यशोगाथा त्यामध्ये केस स्टडीज्, व्हिडीओज्, Testimonials, इत्यादी उल्लेखनीय बाबींचे मराठी व इंग्रजीमध्ये दस्ताऐवजीकरण (Documentation) करून या कार्यालयास सादर करावे. जेणेकरून ते भारत सरकारच्या SSA Shagun या पोर्टलवर अपलोड करण्यासाठी सादर करण्यात येईल.

**(नंद कुमार भा.प्र.से.)**
**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

**प्रति,**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

**प्रत : माहितीस्तव,**

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,**

१) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
४) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
५) प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, सर्व जिल्हे.
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व).
७) शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व).